डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील शिक्षकेतर कर्मचा-यांना आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांना दिनांक १ जुलै, २०२० रोजी देय असलेल्या ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या दुस-या हप्त्याचे प्रदान करण्याबाबत

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अर्थ प्रशासन विभाग

---

वाचा:-१) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक: ३० जून,२०२१.

२) विद्यापीठ अर्थ प्रशासन विभाग आदेश क्र.अप्रवि/अंदाज/७-वेतन आयोग/०१/२०२१/२२३१, दि. २२ फेब्रुवारी,२०२१.

३) विद्यापीठ अर्थ प्रशासन विभाग आदेश क्र.अप्रवि/नि.वे/सा.वे.ह./१७५५/२०१९, दि. २० सप्टेंबर,२०१९.

## आदेश

जा.क्र.अप्रवि/अंदाज/७-वेतन आयोग/२ हप्ता/२०२१/ ४९६. दिनांक: १६ जुलै, २०२१

शासन निर्णय क्र. कृषिवि-३७१९/प्र.क्र.४०/६-अे, दिनांक १६ फेब्रुवारी,२०२१ व संदर्भ क्र.२ अन्वये डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, संलग्न कृषि महाविद्यालये, संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती यांचे अधिनस्त नियमीत आस्थापणेवरील पुर्णवेळ कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचा-यांना व संदर्भ क्र.३ अन्वये दिनांक ०१ जानेवारी,२०१६ पूर्वी च्या सेवा निवृत्त/ कुटूंब निवृत्ती वेतन धारक यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली. तसचे शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगाची थकबाकी सन २०१९-२० पासून पुढील ५ वर्षात, ५ समान हप्त्यांत कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी योजनेच्या खात्यात जमा करण्याचा आणि सेवानिवृत्त कर्मचा-यांना रोखीने अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतची कार्यपध्दती शासन परिपत्रक वित्त विभाग, दिनांक २० फेब्रुवारी,२०१९ अन्वये विहित केली आहे व तसचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अथवा परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचा-यांना थकबाकीची रक्कम ५ वर्षात, ५ समान हप्त्यांत रोखीने अदा करण्याबाबत शासन परिपत्रक ३० मे,२०१९ अन्वये सुचना निर्गमित करण्यात असून त्यानुसार ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा पहिला हप्ता प्रदान करण्यात आला आहे.

आता संदर्भ क्र.१, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक ३० जून, २०२१ व संदर्भ क्र.३ विद्यापीठ अर्थ प्रशासन विभाग आदेश क्र.अप्रवि/नि.वे/सा.वे.ह./१७५५/२०१९, दि. २० सप्टेंबर,२०१९ चे अवलोकन करुन विद्यापीठातील व संलग्न कृषि महाविद्यालये, संलग्न कृषि विद्यालये व ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा व अमरावती येथील आहरण व संवितरण अधिकारी यांनी सातवा वेतन आयोगाच्या थकबाकीचा दुसरा हप्ता प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी .

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

( मागील पानांवर....)

प्रत:-

१.विभाग प्रमुख (सर्व)/ कार्यालयीन प्रमुख (सर्व)/ आहरण व संवितरण अकधकारी (सर्व) यांना माहिति व पुढील कार्यवाहीस्तव.

२. वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला / नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

३. प्रायार्च ..........................................................................................

४. नियंत्रण अधिकारी (सर्व)

५.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

६. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता

प्रतिलिपी:-
कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहिती करीता सादर.

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला